सन २०१८ मधील १३ कोटी वृक्ष लागवडीची संगणकीय माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर अचूक व अदयावत ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसुल व वनविभाग
शासन परिपत्रक क्रमांक साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ९ मार्च, २०१८.

संदर्भ :- १. शासन निर्णय, महसुल व वनविभाग क्र. साववि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११ दि. १०.१०.२०१६
२. शासन निर्णय, महसुल व वनविभाग क्र. साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११ दि. २४.०८.२०१७
३. शासन निर्णय, महसुल व वनविभाग क्र. साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११ दि. १३.०९.२०१७
४. शासन निर्णय, महसुल व वनविभाग क्र. साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११ दि. २८.०९.२०१७

प्रस्तावना:-

राज्यातील ३३% क्षेत्र हरीत आच्छादानाखाली आणण्याचा भाग म्हणून शासनाने ५० कोटी वृक्ष लागवडीची महत्वाकांक्षी आणि नाविन्यपूर्ण मोहीम सुरु केलेली आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०१६ मध्ये दि. ०१.०७.२०१६ रोजी २ कोटी वृक्ष लागवड आणि दि. ०१ ते ७ जुलै २०१७ दरम्यान ४ कोटी वृक्ष लागवडीची मोहीम यशस्वीपणे पार पाडण्यात आलेली आहे. परंतु रोपांची लागवड यशस्वीरित्या झाल्यावर रोपे जिवंत राहण्यासाठी सातत्याने संनियंत्रण केल्यावरच हरित आच्छादानाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास हातभार लागणार आहे. त्यासाठी विभागाने PMIS (Plantation Monitoring Information System) आणि NMIS (Nursery Management Information System) प्रणाली तयार केल्या आहेत.

त्यानुषंगाने २ कोटी वृक्ष लागवड आणि ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेल्या रोपांची ५ वर्षांपर्यंत जिवंत राहण्याची टक्केवारी दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात व मे महिन्यात प्रत्येक विभागाने मोजणी करुन http://mrsac.maharashtra.gov.in या mrsac च्या पोर्टलवरील वन विभागाच्या इंटिग्रेटेड फॉरेस्ट मॅनेजमेंट सिस्टीममध्ये (Integrated Forest Management System) अचूकपणे अपलोड करणे आवश्यक आहे.

तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, वन विभागातील प्रत्येक शाखेकडून १००% लागवडीनंतर जिवंत रोपांची टक्केवारीची माहिती वेळेवर नोंदविली जात नाही. त्यामुळे झालेल्या रोपांच्या लागवडीचे प्रभावीरित्या सनियंत्रण करणे शक्य होत नाही. शासनाचे पारदर्शक, विश्वसनीय आणि जबाबदार प्रशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता खालीलप्रमाणे विस्तृत सूचना निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

परिपत्रक :- प्रस्तावनेतील बाबी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सूचना या परिपत्रकाद्वारे देण्यात येत आहेत.

१. सर्व उपवनसंरक्षक (प्रा.) / विभागीय वन अधिकारी (प्रा.) /सहाय्यक वनसंरक्षक (प्रा.), विभागीय वन अधिकारी, (सामाजिक वनीकरण), विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, सर्व उप वनसंरक्षक (वन्यजीव) /उप संचालक (वन्यजीव) इत्यादी व इतर सर्व संबंधित अधिकारी हे दि. ०१ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत केल्या जाणाऱ्या वनीकरणाशी निगडीत सर्व रोपवन स्थळांची संपूर्ण माहिती संकेतस्थळावर PMIS मध्ये विहीत कालावधीत भरली जाईल, याबद्दल खात्री करतील. जेणेकरून रोपांची लागवड करण्याकरिता तयार करण्यात आलेले खड्डे (Pits) यासंदर्भातील माहिती अद्ययावत करणे शक्य होईल.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म. रा. नागपूर यांचे कार्यालयाकडून देण्यात आलेल्या कालमर्यादेत माहिती अदयावत करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे अथवा नाही याची सर्वस्वी जबाबदारी वर नमूद अधिकाऱ्यांची राहील.

२. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), वनसंरक्षक (सामाजीक वनीकरण), प्रादेशिक व्यवस्थापक, वन विकास महामंडळ, क्षेत्र संचालक तथा मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) आणि इतर संबंधित वरिष्ठ अधिकारी हे दर महिन्याला वरील कामाचा आढावा घेतील. तसेच काही अडचणी असल्यास त्यांचे निराकरण करण्यासंदर्भात मार्गदर्शन करुन त्यांचे अधिनस्त येणा-या अधिका-यांनी वर नमूद सूचनांचे पालन केले अथवा नाही, याची खात्री करतील.

३. विभागीय वन अधिकारी (योजना) हे वनवृत्तांतर्गत येणा-या सर्व रोपवन स्थळांची अदयावत माहिती संकेतस्थळावर भरणे, रोपांची लागवड झाल्यानंतर ऑक्टोबर महिन्याची रोपांची जिवंत टक्केवारी जास्तीत जास्त ३० डिसेंबर पर्यंत व मे महिन्याची रोपांची जिवंत टक्केवारी ३० जुन पर्यंत संकेतस्थळावर भरली जाईल, याची खात्री करतील.

४. त्याचबरोबर वनवृत्तांतील विभागीय वन अधिकारी (दक्षता) हे संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली माहिती वस्तुस्थितीशी सुसंगत आहे किंवा कसे यांची खात्री करतील. एखादया परिस्थितीत संकेतस्थळावरील माहीतीमध्ये तफावत आढळल्यास ती बाब तातडीने मुख्य वनसंरक्षक यांचे मार्फत प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) व ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाचे नोडल अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली जाईल. जेणेकरून तफावतीचे निराकरण तात्काळ करण्यासाठी कार्यवाही करता येईल.

५. रोप लागवडीचे अचूक संरक्षण/ व्यवस्थापन केल्याशिवाय ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच संकेतस्थळावर उपलब्ध माहिती ही सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचत असते. अपवादात्मक परिस्थितीत जर अशी माहिती चूक असेल तर लोकांच्या मनात विभागाबददल गैरसमज किंवा संशय निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा बाबी टाळण्याची नितांत गरज आहे.

६. त्याचप्रमाणे इतर प्रशासकीय विभागांना १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत दिलेल्या उद्दिष्टानुसार रोपवन स्थळांची अक्षांश- रेखांश सह (Geo- Tagging) माहिती, खड्डे तयार करणे आणि वृक्षारोपण झाल्यानंतर रोपांचे जिवंत राहण्याचे प्रमाण इत्यादी बाबतची माहिती वन विभागाच्या संगणकीय प्रणालीवर भरण्याबाबत वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी इतर विभागाच्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच सदर माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर भरली जाईल, याबाबत उप वनसंरक्षक (प्रा.) आणि विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण यांनी खात्री करावी.

७. पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक हे त्यांच्या अंतर्गत येणा-या वनवृत्तांकडून आणि सामाजिक वनवृत्तांकडून नमूद सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात आहे किंवा नाही याची खात्री करतील. कोणत्याही स्वरुपाची अनियमितता/ तफावत आढळल्यास त्यासंदर्भातील वस्तुनिष्ठ अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) व ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाचे नोडल अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमूख) यांच्याकडे सादर करण्याबाबत याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०९१७०१४६५२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.03.09 17:04:03 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, नागपूर.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व).
५. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन आणि व्यवस्थापन), नागपूर
६. व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व विकास), नागपूर.
९. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व).
१०. सर्व क्षेत्र संचालक व प्रकल्प संचालक (वन्यजीव).
११. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) (सर्व).
१२. वनसंरक्षक (सर्व).
१३. उपवनसंरक्षक (सर्व).
१४. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व).
१५. विभागीय वन अधिकारी (प्रा.) (सर्व) .